जवाहर मेडिकल फाऊंडेशनचे

# निवासी व्यसन उपचार व समुपदेशन केंद्र

साक्री रोड, धुळे. पिन ४२४००२

---

## *दारु सोडवा !* *दारु सोडवा !*

धुळे जिल्ह्यात ३० वर्षाहून अधिक काळ सेवा देणाऱ्या जवाहर मेडिकल फाऊंडेशनचे सामाजिक जाणीवेतून जिल्हा व्यसनमुक्त करण्याचा ध्यास घेतला आहे. याचच एक भाग म्हणून नकाणे तलावाच्या किनारी निसर्ग संपन्न जागेत असलेल्या जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या हॉस्पिटल मध्ये निवासी व्यसन उपचार व समुपदेशन केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. या केंद्रात तज्ञ डॉक्टर्स, समुपदेशकांकडून दारु सोडविण्यासाठीचे उपचार केले जातील. तरी आपल्या नातेवाईकांमध्ये, आजुबाजूच्या परिसरात, मित्रमंडळींमध्ये कुणी दारुच्या आहारी जावून आपला संसार उध्वस्त करत असल्यास त्यावर उपचार करण्यासाठी तात्काळ संपर्क करा.

## निवासी व्यसन व उपचार केंद्राची खास वैशिष्ट्ये--

- ✻ तज्ञ डॉक्टर्स व समुपदेशकांकडून उपचार
- ✻ स्वच्छ व हवेशीर जागेत रुग्णांवर उपचार
- ✻ दाखल रुग्णांना उत्तम प्रतीचे नाष्टा व जेवण
- ✻ महिनाभर उपचार केवळ ८ हजार रुपयात (औषधे, चहा, नाष्ट्यासह)
- ✻ रुग्णांसाठी दररोज योगा, मेडिटेशन व व्यायाम
- ✻ सीसीटिव्हीसह चोवीस तास सुरक्षा रक्षक.

## ✻ संपर्क ✻

समन्वयक- राहुल साळुंके 9503211682 / 8686585840


CNN
1



जवाहर मेडिकल फाऊंडेशन, धुळे
ए.सी.पी.एम.मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल
मो. ८६८६५८५८३९, ८६८६५८५८४०
आठवडे बाजार
मोफत आरोग्य शिबीर
www.acpmjnf.com
deanacpm@gmail.com


GPS Map Camera
Malegaon, Maharashtra, India
Killa, GGWJ+98J, Gulshanabad, Malegaon, Maharashtra 423203, India
Lat 20.545934°
Long 74.530668°
14/05/22 10:27 AM
Tilak Rd
Google


GPS Map Camera
Dhule, Maharashtra, India
VPVP+MGP, SRPF Quarter Main Rd, New SRPF
Colony, Dhule, Maharashtra 424002, India
Lat 20.895007°
Long 74.736587°
14/12/22 10:23 AM GMT +05:30
Google


भव्य आरोग्य शिबीर
महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना उपलब्ध
आरोग्य संकल्प
GPS Map Camera
Dhule, Maharashtra, India
VPVP+MGP, SRPF Quarter Main Rd, New SRPF Colony, Dhule, Maharashtra 424002, India
Lat 20.894466°
Long 74.73701°
14/12/22 11:50 AM GMT +05:30
Google


रामकृष्णा नामी उन्मनी साधिली । तयासी लाधली सकळ सिध्दी ॥२॥
सिध्दी बुध्दी धर्म हरिपाठी आले । प्रपंची निवाले साधुसंगे ॥३॥
ज्ञानदेवी नाम रामकृष्णा ठसा । येणे दशदिशा आत्माराम ॥४॥



कान, नाक व
घसा तपासणी
महिला
कान, नाक व
घसा तपासणी
महिला

# कोविड, म्युकरमायकोसीस, हॅपीटायटीस बी रुग्णाला जवाहर फाउंडेशनच्या डॉक्टर्स टिमने दिले 'जीवदान'



**धुळे -** कोरोनाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसरी लाट ही तीव्र आहे. या लाटेनंतर पोस्ट कोविड रूग्णांमध्ये म्युकरमायकोसिस हा भयंकर आजार वेगाने पसरू लागला. अशाच आजारात नांदर्डे ता. शिरपूर येथील किरणसिंग पावरा वय ३५ तीव्र आजारी पडला. त्यास कोविड, पोस्ट कोविड, म्युकरमायकोसिस, हॅपीटायटीस बी आजार होते. त्याची घरची परिस्थितीही जेमतेम. या गरीब रूग्णांवर धुळ्याच्या जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या डॉक्टरांनी जोखीम पत्करत शस्त्रक्रिया केली. ती यशस्वी होवून रूग्णास जीवदान मिळाले आहे.

शिरपूर तालुक्यातील नांदर्डे येथील किरणसिंग पावरा याला काही दिवसांपूर्वी कोरोना झाला होता. त्यातून तो काहीअंशी बरा झाल्यानंतर त्याच्यात काही दिवंसांनी म्युकरमायकोसिसची लक्षणे जाणवू लागली. त्यामुळे तो उपचारासाठी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये असलेल्या म्युकरमायकोसिस वॉर्डात दाखल झाला. त्याठिकाणी त्यावर उपचार सुरू झाले. प्राथमिक तपासणीत पावरा हॅपिटायसिटस बी पाझिटिव्ह आढळून आला. त्याद्वारे कोविडचा संसर्गासह अन्य धोके, मोठ्या प्रमाणात संसर्ग होणार, हे माहित असताना डेंटल कॉलेजच्या ओरल मॅक्सिलोफेशियल सर्जरीचे विभागप्रमुख डॉ. बी.एम.रूडगी यांनी पावरा याच्यावर तत्काळ शस्त्रक्रिया करण्याचा धाडसी निर्णय घेतला. भूलतज्ञ डॉ. मनोजकुमार कोल्हे यांच्या सहकार्याने रूग्णांला भूल देण्यात आली. डॉक्टरांच्या सर्व टिमच्या सहकार्याने रूग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली.

शस्त्रक्रियेसाठी माजीमंत्री रोहिदास पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.अरूण दोडामनी, वैद्यकीय अधीक्षक डॉ.मधुकर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. शस्त्रक्रियेयासाठी डॉ. श्रीराम, डॉ. विनायक, डॉ.प्राची यांनी सहकार्य केले.

# म्युकरमायकोसिस रुग्णांना जवाहर फौंडेशनचा आधार

## आ.पाटलांच्या पुढाकाराने १०० खाटांचे अद्ययावत वार्ड

**धुळे, दि.२३- कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतांनाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहीले आहे. अशा रुग्णांना आधार देण्यासाठी आता धुळयात आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडीकल फौंडिशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले असून या ठिकाणी दिवसरात्र तज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत.**

दरम्यान, उत्तर महाराष्ट्रात १०० खाटांचे वार्ड सुरु करणारे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे धुळ्याचे जवाहर मेडीकल हे पहिले हॉस्पीटल ठरले असून यामुळे रुग्णांना चांगलाच आधार मिळाला आहे. कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकॉरमायकोसिस ह्या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. या आजाराचे प्रमाण धुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळुन आले आहेत. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, डोळा दुखणे, सुजणे दृष्टी कमजोर होणे अशी लक्षणे



आढळून येतात. तत्काळ उपचार झाल्यास रुग्ण बरा होतो अन्यथा डोळा गमवावा लागतो तर काहींचा मृत्यूही ओढवला जातो. अशा रुग्णांना धुळ्यातच उपचार मिळावेत आणि त्यांना आधार मिळावा म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनचे चेअरमन डॉ.भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकारातून व डॉ.ममताताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडीकल फौंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहर मेडीकल येथे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले. आ.पाटील यांच्या हस्ते आज दि.२३ मे रोजी या उपचार केंद्राला सुरुवात करण्यात आली.

यावेळी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, मागील वर्षी कोरोना आजार आल्यानंतर रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत म्हणून जवाहर मेडीकलने पुढाकार घेवून १०० खाटांचे वार्ड **(पान ४ वर)**

# अन माजी सैनिकाची आई स्वतःच्या पायाने चालू लागल्या

# जवाहर मेडीकलमध्ये कृत्रिम सांधेरोपण




**धुळे (यशवर्धन देवरे,दै.धुळे दवंडी)**: योग्य आणि वेळीच उपचार व यशस्वी शस्त्रक्रीयेमुळे कुसूंबा ता.धुळे येथील माजी सैनिकाच्या आई आकाबाई हिंमराव पाटील यांची कृत्रिम सांधेरोपणाची शस्त्रक्रीया झाली. जवाहर मेडीकल फाऊंडेशन संचलित एसीपीएम मेडीकल कॉलेजचे हॉस्पीटल मोराणे प्र.ल.धुळे येथील वैद्यकीय पथकाने शस्त्रक्रीया केली. ही शस्त्रक्रीया माजी सैनिक आरोग्य योजनेंतर्गत करण्यात आली. त्यामुळे वृध्दापकाळातही आपली आई स्वतःच्या पायावर चालू लागण्याचा आनंद मुलांना होत आहे. जवाहर मेडीकल फाऊंडेशन संचलित एसीपीएम मेडीकल कॉलेजचे हॉस्पीटल मोराणे प्र.ल.धुळे हे सर्वसामान्य,गोरगरीब रुग्णांसाठी उपचाराचे हक्काचे ठिकाण बनले आहे. तज्ञ डॉक्टर, विविध सुविधा आणि योग्य वैद्यकीय सल्ला यामुळे येथे आलेल्या रुग्णांवर यशस्वी उपचार होत असतात. दरम्यान कीचकट,अवघड अशा दुर्मिळ शस्त्रक्रीयाही येथे यशस्वीपणे केल्या जात आहेत. कुसूंबा ता.धुळे येथील आकाबाई हिंमतराव पाटील यांना सांधेदुखीचा त्रास सतावत होता.

त्या माजी सैनिकाच्या मातोश्री आहेत. त्यांना उपचारासाठी जवाहर मेडीकल फाऊंडेशन संचलित एसीपीएम मेडीकल कॉलेजचे हॉस्पीटल मोराणे प्र.ल.धुळे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. येथील डॉक्टरांनी योग्य त्या सर्व वैद्यकीय तपासण्या करुन त्यांना कृत्रिम सांधेरोपण शस्त्रक्रीयेचा सल्ला दिला.त्यानंतर आकाबाई पाटील यांच्यावर सांधेरोपणाची शस्त्रक्रीया नाशिक येथील तज्ञ डॉ. राकेश सुभाष गोसावी यांनी यशस्वीपणे केली.

ही शस्त्रक्रीया माजी सैनिक आरोग्य योजनेतून करण्यात आली. दरम्यान शस्त्रक्रीयेनंतर रुग्णास स्वतःच्या पायावर पूर्णपणे वजन देत चालण्यास सांगितले. आई स्वताच्या पायाने चालत असल्याचे पाहून माजी सैनिक व त्यांच्या नातेवाईकांना आनंद झाला. यशस्वी शस्त्रक्रीया करणार्या डॉक्टरांचे व त्यांच्या वैद्यकीय पथकाचे जवाहर मेडीकल फाऊंडेशनचे अध्यक्ष आ.कुणाल पाटील,सचिव डॉ.ममताताई पाटील, तसेच अधिष्ठाता डॉ.प्रशांत सोळंके, डॉ.मधुकर पवार यांनी अभिनंदन केले आहे.

# जवाहर फौउंडेशनच्या नेत्र विभागातर्फे जागतिक काचबिंदू सप्ताहनिमित्त कार्यक्रम

**धुळे ★खान्देश खबर वृत्त★** जवाहर मेडीकल फौउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयातील नेत्र विभागातर्फे जागतिक काचबिंदू सप्ताहनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.१३ मार्च हा जागतिक काचबिंदू सप्ताह पाळला जातो. त्याअनुषंगाने जवाहर मेडीकल फौउंडेशनच्या एसीपीएम रुग्णालयात सप्ताहाचे औचित्य साधुन मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या सचिव डॉ.ममताताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेच्या



कार्यक्रमात डॉ.ममताताई पाटील आणि नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र वडगावकर यांनी मार्गदर्शन केले. तर काचबिंदू विषयी संदेश देणाऱ्या

पवार,डॉ.अरुंधती गद्रे, डॉ.शोधन गोंदकर, डॉ.शोभना पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.योगेश तांबोळी,

डॉ.केतकी देवतळे,डॉ.गौरव पाटील जगदिश खैरनार, बापू देसले, रामचं पाटील, सौ.जया बागुल यां परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

# जवाहर फाउंडेशनच्या नेत्र विभागातर्फे जागतिक काचबिंदू सप्ताह कार्यक्रम




**धुळे** : जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयातील नेत्र विभागातर्फे जागतिक काचबिंदू सप्ताहनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

१३ मार्च हा जागतिक काचबिंदु सप्ताह पाळला जातो. त्याअनुषंगाने जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम रुग्णालयात सप्ताहाचे औचित्य साधून मोफत तपासणी शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या सचिव डॉ.ममता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. काचबिंदु सप्ताहनिमित्त कर्मचाऱ्यांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमात डॉ.ममता पाटील आणि नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र वडगावकर यांनी मार्गदर्शन केले. काचबिंदु विषयी संदेश देणाऱ्या आकर्षक रांगोळया विद्यार्थीनींनी काढून रुग्णांपर्यंत माहिती पोहचविण्याचे काम केले. कार्यक्रमाला अधिष्ठाता डॉ.प्रशांत सोळंके, डॉ.नंदकुमार द्रविड, डॉ.ए.डब्ल्यू. पाटील, डॉ.आर.व्ही.पाटील, डॉ.मधुकर पवार, डॉ.अरुंधती गद्रे, डॉ.शोधन गोंदकर, डॉ. शोभना पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.योगेश तांबोळी, डॉ.केतकी देवतळे, डॉ.गौरव पाटील, जगदीश खैरनार, बापू देसले, रामचंद्र पाटील, जया बागुल यांनी परिश्रम घेतले.

Smart Dhule Edition
Mar 15, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

सकाळ

# सर्पदंश झालेल्या रुग्णाला जवाहर फाउंडेशनचे जीवदान

धुळे, ता. ११ : येथील मोराणे शिवारातील जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या वैद्यकीय पथकाने तत्काळ उपचारातून सर्पदंश झालेल्या लवकी (ता. शिरपूर) येथील ६८ वर्षीय वृद्धास मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. त्यामुळे त्यास जीवदान मिळाले.

फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व रुग्णालयात अवघड उपचार, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रीयेतून असंख्य रुग्णांना जीवदान दिले जाते. अल्पदरात तसेच शासकीय योजनेतून तत्काळ उपचार केले जातात. लवकी येथील हिरामण जयसिंग राठोड यांना सर्पदंश झाला. त्यांनी शिरपूरला प्राथमिक उपचार सुरु केले. मात्र, त्यांच्या किडनीचे कार्य बंद पडले. फुफ्फुसात पाण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे ते गंभीर होत गेले. त्यांना मुलगा नरेंद्रसिंग राठोड यांनी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या रुग्णालयात दाखल केले. डॉ. रोहन कुळकर्णी यांनी उपचार सुरु केले. नंतर किडनीरोग तज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध ढोकरे यांनी फुले जन आरोग्य योजनेंतर्गत दहा डायलिसिस केले. वेळीच उपचारामुळे श्री. राठोड यांना जीवदान मिळाले. याबद्दल फाउंडेशनचे अध्यक्ष आमदार कुणाल पाटील, सचिव डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोलंके, मेडिसीन विभागप्रमुख डॉ. दिलीप पाटील, डॉ. आर. व्ही. पाटील, डॉ. मधुकर पवार यांनी समाधान व्यक्त केले.



**धुळे : जवाहर मेडिकल फाउंडेशन रुग्णालयात जीवदान मिळालेल्या रुग्णासह उपस्थित डॉक्टर.**

Dhule, Dhule-Today
12/03/2023 Page No. 2

लोकमत

जवाहर मेडिकल फाउंडेशनचे डॉक्टर ठरले महिलेसाठी देवदूत

# महिलेच्या गर्भाशयातून काढली तीन किलोची गाठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** एका महिलेच्या गर्भाशयात तीन किलो वजनाची गाठ शस्त्रक्रिया करून काढण्यात जवाहर मेडिकल फाउंडेशनचे डॉक्टरांना यश आले. दरम्यान गेल्या अनेक महिन्यांपासून पोटदुखीच्या मरण यातना सहन करणाऱ्या महिलेसाठी जवाहर मेडिकल फाउंडेशन एक प्रकारे देवदूतच ठरले.

साक्री तालुक्यातील एका ४७ वर्षीय महिलेला गेल्या अनेक महिन्यांपासून पोटदुखीचा त्रास होता. त्यांनी अनेक ठिकाणी वैद्यकीय उपचार केले, मात्र पोटदुखीचा त्रास कमी होत नव्हता परिणामी दिवसेंदिवस त्या महिलेची



यशस्वी शस्त्रक्रिया करणारे डॉ. नितीन कुलकर्णी, डॉ. अमोल कोरान्ने, भूलतज्ज्ञ डॉ. मनोल कोल्हे, डॉ. मानसी पानट, डॉ. अनंत, डॉ. प्रियंका, डॉ. आकांक्षा.

प्रकृती खालावत होती. अखेर त्यांना जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून खात्रीशीर उपचाराचा आशेचा किरण गवसला. सदर महिलेला त्यांच्या नातेवाइकांनी जवाहर मेडिकल फाउंडेशन मध्ये उपचारासाठी दाखल केले. येथील स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. शोधन गोदकर (नाशिक) यांनी अति तात्काळ वैद्यकीय उपचार सुरू केले. आजाराचे गांभीर्य लक्षात घेऊन रुग्णाची तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला. शस्त्रक्रियेत गर्भाशयातून तब्बल तीन किलो वजनाची तंतूमय मांस गाठ काढण्यात आली. शस्त्रक्रिया करून यशस्वीपणे उपचार करण्यात आले. याकामी डॉ. नितीन कुलकर्णी, डॉ. अमोल कोरान्ने, भूलतज्ज्ञ डॉ. मनोल कोल्हे, डॉ. मानसी पानट, डॉ. अनंत, डॉ. प्रियंका, डॉ. आकांक्षा, डॉ. सायली यांचे सहकार्य मिळाले. वैद्यकीय पथकाचे जवाहर मेडिकल फाउंडेशनचे चेअरमन आमदार कुणाल पाटील, सचिव डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. अलका पाटील यांनी कौतुक केले

लोकमत

# पित्ताशय नलिकेतील खडे काढून रुग्णाला दिले जीवदान

## ६७ वर्षीय रुग्णाला पोटदुखीच्या वेदनेतून मिळाली मुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** शहरातील ६७ वर्षीय रुग्णाच्या पित्ताशय नलिकेतील खडे यशस्वीरीत्या काढण्यात जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या चमूला यश आले आहे. मोफत शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची असह्य वेदनेपासून सुटका झाली आहे.

धुळे शहरातील अभय कॉलेजजवळ राहणारे वसंत जाधव, वय ६७ यांना मागील अनेक दिवसांपासून पोटदुखीचा त्रास सुरू होता. प्राथमिक तपासणीत त्यांचे पित्ताशय व यकृताला जोडणारी मुख्य नलिका यात खडे अडकून ऑबस्ट्रिक्टिव्ह जॉइंडिस अर्थात कावीळ झाल्याचे निदान झाले होते. शिवाय त्यांना तीव्र दमा असल्याने भूल देणे आव्हानात्मक



काम होते. त्यामुळे पित्ताशय काढून नळीतील खडे काढण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. त्यानुसार ८ मार्च रोजी सर्जन डॉ. अक्षय कुलकर्णी, डॉ. कैलाश गिंदोडिया, डॉ. सौरभ निकुंभ यांनी ही यशस्वी शस्त्रक्रिया पूर्ण केली. भूल देण्याचे आव्हानात्मक काम डॉ. मनोजकुमार कोल्हे व डॉ. मानसी पानट यांनी केले. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. अली, डॉ. सिद्धेश, डॉ. शिवम, डॉ. ओमकार, सिस्टर रेखा चौधरी व ब्रदर, विकास यांचे सहकार्य लाभले. आठ दिवसांत जाधव पूर्णपणे बरे झाले असून, आता त्यांना जेवणही पचायला लागले आहे. शस्त्रक्रियेसाठी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर पवार यांनी डॉक्टरांच्या चमूचे अभिनंदन केले आहे.

### दमा असल्याने अडथळे

वसंत जाधव यांना दम्याची व्याधी असल्याने त्यांना शस्त्रक्रियेपूर्वी भूल देणे आव्हानात्मक होते. मात्र डॉक्टरांनी कौशल्यपणाला लावून भूल दिली व शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

लोकमत

माझी वसुंधरा अभियान, जवाहर मेडिकल कॉलेजचा उपक्रम

# भावी डॉक्टरांनी केली परिसरात स्वच्छता

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** माझी वसुंधरा अभियानांतर्गत राज्य सरकार व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिलेल्या निर्देशानुसार कालावधीत जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलच्यावतीने कॉलेज परिसर, नकाणे तलाव, मोराणे गाव आदी परिसरात स्वच्छता अभियान व स्वच्छता मोहिम राबविण्यात आली होती. मोहिमेत एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून स्वच्छतेचे महत्व तसेच पर्यावरणाची जनजागृती व्हावी यासाठी राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, माझी वसुंधरा अभियान आणि युनिसेफ महाराष्ट्र राज्य कार्यक्रम यांनी स्वच्छतेविषयक जनजागृती करण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशांचे पालन करत एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या भावि डॉक्टरांनी या मोहिमेत सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.प्रशांत सोळंके, वैदयकीय अधिक्षक डॉ. आर. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ.आरती कर्णिक, अस्थीरोग विभागाचे प्रमुख डॉ.यशवंत महाले, डॉ.राहुल घोणे, प्रा.घोणे, प्रशासन अधिकारी ॲड राकेश काकुस्ते, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. सुभाष बोथीकर, नर्सिंग कॉलेज स्टाफ आदींनी विशेष परिश्रम घेतले.



धुळे तालुक्यातील हरणमाळ येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी व शिक्षक.

# आरोग्य विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त एसीपीएममध्ये विद्यार्थ्यांकडून वृक्षलागवड



**धुळे ★खान्देश खबर वृत्त★**

जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निर्देशानुसार आझादी का अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत विद्यापीठाचा वर्धापन दिन वृक्षारोपण कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी २५ विद्यार्थी २५ झाडे हा पर्यावरणपुरक सोहळा साजरा करण्यात आला. याशिवाया विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठ गीतही लावण्यात आले होते.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.प्रशांत सोळंके, वैदयकीय अधिक्षक डॉ.आर.व्ही. पाटील, पीएसएम विभागप्रमुख डॉ.अनंत बोर्डे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.गणेश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना सहायक प्रा.सुभाष बोथीकर, प्रशासन अधिकारी ड.राकेश काकुस्ते, उद्यानप्रमुख आत्माराम सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी एमबीबीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेणा-या २५ विद्यार्थ्यांना २५ रोपे देण्यात आली. या रोपांचे महाविद्यालयाच्या बॉईज हॉस्टेल परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या रोपांचे संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने ठिबक सिंचन व्यवस्था करण्यात आलेली आहे. दरम्यान या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरणाला चांगला हातभार लागणार आहे. या कार्यक्रमाबरोबरच आरोग्य विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिम्मित विद्यापीठ गीत लावत ध्वजारोहन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एमबीबीएस तसेच नर्सिंगचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.


GPS Map Camera
Dhule, Maharashtra, India
VQV9+CC6 Hire Bhavan, District Court Rd,
Green Park, Dhule, Maharashtra 424001, India
Lat 20.893252°
Long 74.768072°
28/02/23 09:43 AM GMT +05:30
Google




GPS Map Camera
Dhule, Maharashtra, India
Dr Babasaheb Ambedkar Sandesh Bhumi Rd,
Sriram Nagar, Dhule, Maharashtra 424006, India
Lat 20.89418°
Long 74.767376°
28/02/23 10:05 AM GMT +05:30
Google








GPS Map Camera
Dhule, Maharashtra, India
VQV8+CMV, Chitod Rd, Deshmukh Nagar, Sambhappa
Colony, Dhule, Maharashtra 424006, India
Lat 20.893873°
Long 74.767172°
08/04/23 09:25 AM GMT +05:30
Google

